# संपूर्ण चाणक्य-नीती

संपादन

**पुष्पा ठक्कर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**संपूर्ण चाणक्य-नीती**
संपादन : पुष्पा ठक्कर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**संपादन**
पुष्पा ठक्कर
६६, महात्मा गांधीनगर, रेल्वेस्टेशन रोड,
फायर ब्रीजच्या मागे, औरंगाबाद.
फो. नं. ०२४०-२३४७५७६, मो. नं. ९७६४२८०२१६

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३४०/-

माणूस उच्चासनावर विराजमान झाल्यामुळे नव्हे, तर

त्याच्या गुणांमुळेच महान बनत असतो.

महालाच्या उंच शिखरावर बसल्यामुळे

कावळा गरुड बनू शकत नाही.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | चाणक्य आणि त्याचे जीवन | ......... | ७ |
| २. | राजा धनानंद | ......... | १४ |
| ३. | चंद्रगुप्ताचा शोध | ......... | २० |
| ४. | तक्षशिलेत चंद्रगुप्त | ......... | २५ |
| ५. | महान राजा सिकंदर आणि तत्कालीन भारत | ......... | २९ |
| ६. | चाणक्याचे योगदान | ......... | ३५ |
| ७. | चाणक्याचा संकल्प | ......... | ४१ |
| ८. | चाणक्य : एक मूल्यांकन | ......... | ४७ |
| ९. | चाणक्य-नीती दर्पण | ......... | ५० |
| १०. | चाणक्य सूत्र | ......... | २०० |
| ११. | कौटिल्य अर्थशास्त्र : एक संदर्भ | ......... | २४६ |
| १२. | चाणक्य-वाणी | ......... | २७६ |


✦✦✦

## *चाणक्य आणि त्याचे जीवन*

**जन्म...**

एका बौद्ध ग्रंथानुसार सुमारे २३०० वर्षांपूर्वी तक्षशीलेत 'चणक' नावाच्या एका बुद्धिमान ब्राह्मणाच्या घरी चाणक्याचा जन्म झाला. इ. स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर हा प्रदेश पाकिस्तानात गेला. रावळपिंडीच्या ईशान्येला सुमारे २० मैल अंतरावरील सरायकला नावाच्या गावाजवळ तक्षशीला शहर वसलेले होते. हे नगर त्या काळी भारताच्या वायव्य प्रांतातील एक सुप्रसिद्ध नगर होते. तक्षशीला ही त्या काळी गांधार (भारत) देशाची राजधानी होती.

रामाचा सर्वात लहान भाऊ भरत याला दोन मुलगे होते. एकाचे नाव 'तक्ष', तर दुसऱ्याचे नाव 'पुष्कल' असे होते. भरताने गांधार देश जिंकून घेतला होता. त्याने तो जिंकलेला प्रदेश आपला मुलगा तक्ष याला दिला, तो प्रदेश तक्षशीला या नावाने ओळखला जाऊ लागला.

काही विद्वानांचे मत असे आहे की, चाणक्याचे वडील चणक हे पंजाबातील चणक येथील मूळ निवासी होते आणि म्हणूनच त्यांचा मुलगा चाणक्य या नावाने ओळखला जाऊ लागला.

काही विद्वान त्यांना दक्षिण भारतीय ब्राह्मण मानतात. कांचीपुरम अथवा केरळ हे त्यांचे जन्मस्थान मानतात. चाणक्याचा सावळा रंग आणि दाक्षिणात्य वाटणारे त्याचे द्रमिल, द्रामिल किंवा पक्षिल स्वामी असे उपनाव यावरून त्यांनी असा तर्क लावला आहे.

दाक्षिणात्य विद्वानांच्या समजुतीनुसार चाणक्याचे निवासस्थान केरळ हे आहे. एकदा ते तीर्थयात्रेसाठी वाराणसी येथे गेले असताना तिथे त्यांची कन्या हरवली. त्यानंतर ते कधीच केरळला परतले नाहीत आणि मगधलाच स्थायिक झाले; पण ते दाक्षिणात्य असल्याचा कोणताही भक्कम व ऐतिहासिक पुरावा मिळत नाही.

काही विद्वान मगध येथील पाटलीपुत्र हे चाणक्याचे मूळ निवासस्थान असल्याचा दावा करतात आणि कुसुमपूर हे त्याचे जन्मस्थळ मानतात; परंतु

यापैकी चाणक्याचे निवासस्थान, जन्मस्थळ व त्याचे माता-पिता याविषयी कोणतेही अचूक पुरावे उपलब्ध नाहीत.

काही लोक चाणक्याला भृगू किंवा जमदग्नीवंशी मानतात, तर काही त्याला कुटलवंशीय मानतात; परंतु कुटल हे कधीही ऐकिवात नसलेले गोत्र आहे. चाणक्याची नेमकी जन्मतारीख माहीत नसल्यामुळे त्याच्या आयुष्याविषयी नेमके काही सांगता येत नाही. चारशे वर्षांपूर्वीचा हा काळ मगध सत्तेच्या संक्रमणाच्या दृष्टीने उल्लेखनीय काळ होता. यावेळी नंद वंशाच्या सत्तेचा अंत झाला आणि चंद्रगुप्त हा चाणक्याच्या मदतीने राजा झाला हे मात्र प्रमाणित सत्य आहे. इ. स. पूर्व ३४६ हा चंद्रगुप्ताचा जन्मकाळ असल्याचे अनुमान लावले जाते. त्यामुळे नक्कीच चाणक्याचा जन्म त्यापूर्वी झाला असावा असे म्हणता येईल.

अनेक विद्वानांचे मत असे आहे की, चाणक्याचा जन्म तक्षशीलेत झाला होता. त्याच्या वडिलांचे नाव चणक, तर आईचे नाव चणेश्वरी होते. हे एक बुद्धिमान ब्राह्मण कुटुंब होते. जैनधर्मीय मुनींनीच चणक ब्राह्मणाच्या मुलाचे नाव 'चाणक्य' ठेवले होते; पण त्याचे आई-वडील त्याला विष्णुगुप्त या नावाने हाक मारायचे.

काही जैनधर्मीय मुनींनी चणकाला प्रेरित केले की, त्याने त्याच्या मुलाला, विष्णुगुप्तला जैन मुनी बनवावे; परंतु विष्णुगुप्तने (चाणक्य) आपल्या आई-वडिलांच्या इच्छेविरुद्ध गावातील एका शाळेत शिक्षण घ्यायला आरंभ केला.

### पिता चणक...

चाणक्याचे वडील चणक हे ब्राह्मण होते. अत्यंत धर्मनिष्ठ असलेल्या त्याच्या वडिलांनी आपल्या गरजा भागवण्यासाठी कधीच कोणासमोर हात पसरला नाही. कर्मकांड आणि पूजापाठ करून ते आपल्या कुटुंबाचे पोट भरत.

चणकाचा मित्र 'शटकार' हा मगध राज्याच्या नंद राजाचा महामंत्री होता. स्वत:च्या योग्यतेच्या बळावर तो नंद राजाचा महाअमात्य बनला होता. त्याने आपला मित्र चणक याला राज्याचे राजपुरोहितपद मिळवून दिले. एकदा चणकाच्या घरी काही साधू आले होते. चणकाने उत्सुकतेने त्या साधूंना आपला मुलगा चाणक्य याच्या भविष्यासंबंधी विचारले. चाणक्याच्या तोंडातून दोन दात बाहेर आलेले पाहून त्या साधूंनी अशी भविष्यवाणी वर्तवली की, हा मुलगा चक्रवर्ती सम्राट बनेल किंवा चक्रवर्ती राजाचा गुरू बनेल.

चणक राजपुरोहित होता, तसाच तो निस्सीम राष्ट्रभक्तही होता. विलासी वृत्तीचा मगध नरेश धनानंद हा सदैव सुरा आणि सुंदरींचा आनंद उपभोगण्यात मग्न असायचा. महाअमात्य शटकार आणि कात्यायन यासारख्या योग्य मंत्र्यांच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे सोपवली गेली होती. त्यांच्यासोबत राक्षस नावाचा एक मंत्रीही होता. हे तिन्ही मंत्री एकत्रितपणे राज्यकारभार पाहत.

धनानंदाच्या विलासप्रियतेच्या क्षुद्र वृत्तीमुळे मगध राज्य पतनाच्या खाईच्या टोकाशी येऊन पोहोचले होते. चणक वेळोवेळी महाअमात्य असलेल्या आपल्या मित्राला– शटकाराला राज्याच्या बिकट परिस्थितीविषयी सावध करायचा. विलासी नंद राजाला राज्यसिंहासनावरून काढून टाकून एखाद्या योग्य व्यक्तीला मगधचा राजा बनवावे आणि मगध राज्याचे विनाशापासून रक्षण करावे, असे चणकचे म्हणणे होते. ही गोष्ट महाअमात्य शटकाराला चांगलीच माहीत असूनही तो काहीच करू शकत नव्हता. गृहमंत्री राक्षस हा धनानंद राजाचा अत्यंत जवळचा असा विश्वासातील माणूस होता. अशा परिस्थितीत एकटा महाअमात्य शटकार काय करू शकत होता? तो मगध राज्याचा दिवसेंदिवस होत जाणारा विनाश हताशपणे पाहत होता, तर दुसरीकडे शटकाराच्या महाअमात्यपदावर राक्षसाचा डोळा होता. तो शटकार आणि चणकाविरुद्ध नंद राजाचे कान फुंकायचा. नंदराजासुद्धा महाअमात्य शटकाराकडे अविश्वासाच्या नजरेने पाहू लागला होता.

चणकसुद्धा मुत्सद्दी, कूटनीती होता आणि तो वेळोवेळी शटकाराला योग्य सल्ला द्यायचा. शेवटी एके दिवशी महाअमात्य शटकार आणि राजपुरोहित ब्राह्मण चणकाविरुद्ध नंद राजाच्या मनात शंकेचे बी पेरण्यात राक्षसाला यश मिळाले. परिणामी, शटकाराला त्याची पत्नी व दोन मुलींसोबत कैदेत टाकण्यात आले आणि राक्षसाची नवीन महाअमात्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

शटकार आणि चणक या दोघांवर राजद्रोहाचा आरोप लावण्यात आला. शटकारापेक्षा अधिक स्पष्टवक्ता असलेल्या आणि धनानंदाच्या विलासी वृत्तीला विरोध करणाऱ्या चणकावर राजा धनानंदाचा शटकारापेक्षाही जास्त राग होता. म्हणून राजाच्या इतर विरोधकांना धडा शिकवण्यासाठी त्याने सगळे नियम आणि कायदे धाब्यावर बसवून चणकाचे शिर धडावेगळे करून ते चौरस्त्याच्या मधोमध लटकावण्याचा मूर्खपणाचा आदेश दिला; परंतु नवीन महाअमात्य राक्षस अशा प्रकारच्या दंडाच्या बाजूने नव्हता, कारण नीतीज्ञ राक्षसाला या गोष्टीची चांगलीच जाणीव होती की, ब्राह्मणाची हत्या केली गेली तर प्रजेचा राग भडकून उठेल.

नवीन महाअमात्य राक्षसाने चणकाला आग्रह केला की, त्याने राजा धनानंदाची माफी मागावी; परंतु राष्ट्रभक्त आणि धर्मनिष्ठ चणकाने सांगितले की, जरी आपला जीव गेला तरी चालेल, पण आपण या दुराचारी राजाची माफी मागणार नाही. एक तुच्छ ब्राह्मण आपल्या सत्तेला आव्हान देत आहे, आपल्याला विलासी आणि चारित्र्यहीन ठरवून आपला अपमान करीत आहे, या गोष्टीमुळे राजा धनानंद रागाने अगदी वेडापिसा झाला, तर इकडे हा ब्राह्मण क्षमा मागण्याऐवजी राष्ट्रासाठी आत्मबलिदान करण्यास तयार झाला होता. शेवटी ब्राह्मण चणकाचे शिर धडावेगळे करून ते चौरस्त्यावर लटकावण्यात आले. संपूर्ण राज्यात हाहाकार माजला. नंद राजा आणि अमात्य राक्षसाची चोहीकडे दहशत पसरली. नंदाने चणकाला कैदेत टाकल्यानंतर चाणक्याला वाटले की, आता नंद राजा आपल्यालाही कैद करून आपली हत्या करवून टाकील म्हणून तो आपली आई चणेश्वरीसोबत जंगलात निघून गेला.

ती रात्र भयानक वादळी पावसाची होती. बाल चाणक्याला ही गोष्ट समजल्यावर त्याचे मन घृणेने आणि रागाने प्रक्षुब्ध झाले. अत्यंत धाडस दाखवत बाल चाणक्य त्या घनघोर वादळी पावसाच्या रात्री शहरातील चौरस्त्यावर पोहोचला. त्याने आपल्या वडिलांचे शिर घेतले आणि गंगाकिनारी जाऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. त्यानंतर त्याने वडिलांच्या अस्थी आणि रक्षा एका कलशात भरून तो कलश एका झाडाच्या बुंध्याच्या मुळाशी लपवून ठेवला. त्याने दृढनिश्चय केला की, जोपर्यंत तो अत्याचारी नंद राजावर सूड उगवणार नाही आणि त्याच्या संपूर्ण वंशाचा नाश करणार नाही, तोपर्यंत तो त्याच्या वडिलांच्या अस्थींचे गंगेत विसर्जन करणार नाही.

चाणक्य अतिशय प्रतिभाशाली होता. तो तीव्र बुद्धिमान तसेच हट्टी स्वभावाचाही होता. त्याचे मन आणि बुद्धी दोन्हीही विशाल होते. आपल्या प्रतिज्ञेवर ठाम राहणे हे त्याच्या चारित्र्याचे अद्‌भुत वैशिष्ट्य होते.

एकदा चाणक्याची आई रडत होती. तिला साधूंची भविष्यवाणी आठवली की, या मुलाचे दोन दात तोंडाबाहेर आल्यामुळे हा मुलगा चक्रवर्ती राजा बनेल. चाणक्याने आपल्या आईला तिच्या रडण्याचे कारण विचारल्यावर आई म्हणाली की, ''बाळा, तुझ्या नशिबात राजा बनणे लिहिले आहे. राजा बनल्यावर तू मला सोडून देशील आणि मला विसरून जाशील.'' आपल्या आईच्या तोंडून अशी विचित्र गोष्ट ऐकल्यावर चाणक्याने तिला विचारले की, ''तुला कसे ठाऊक की,